# कोविड-१९, टाळेबंदीतून निर्माण झालेल्या ओटीटी माध्यमांचा अभ्यास

**डॉ. प्रोफेसर रामानंद बापुराव व्यवहारे**
प्रोफेसर, वृत्तपत्रविद्या आणि जनसंवाद
श्री शिवाजी महाविद्यालय,परभणी-४३१४०१

**प्रस्तावना :-**

मागील दीड वर्षापासून कोरोना आणि त्यामूळे लागू केल्या गेलेल्या टाळेबंदीचा जबर फटका चित्रपट माध्यमाला बसला. यातून बाहेर पडून आपले अस्तित्व कायम ठेवण्यासाठी ओवर द टॉप म्हणजेच ओटीटी माध्यमांचा मोठया प्रमाणावर वापर सुरू झाला. चित्रपट माध्यम कधीही थांबणार नाही. ठप्प होणार नाही हे यातून स्पष्ट झाले. मोठया दीर्घकालीन टाळेबंदीमुळे अनेकांकडे करमणुकीसाठी भरपूर वेळ होता. या बिकट परिस्थितीमध्ये करमणूक आवश्यक होती. त्याचा फायदा ओटीटी माध्यमांनी उचलला. चित्रपटगृहे पूर्ण क्षमतेने सुरू होतील. त्याला प्रेक्षक चांगला प्रतिसाद देतीलही, ओटीटी माध्यमांनी कोविड-१९ मधील कडक टाळेबंदीत चित्रपटांसह प्रेक्षकांना तारले हे फार मोठे सत्य कोणालाही नाकरता येणार नाही. भविष्यात चित्रपटगृहाची जागा ओटीटी माध्यमं घेतील. कोरोनाकाळात ओटीटी एक स्वतंत्र मनोरंजनाची माध्यमं म्हणून पुढे आली आहेत. या माध्यमांचे महत्व वाढले आहे, संख्या वाढली आहे. त्यामूळे ओटीटी माध्यमांच्या नियमनाचा प्रश्न निर्माण झाला. केंद्र सरकारने सेन्सॉरशिप लादली. त्यामूळे अभिव्यक्ति स्वातंत्र्यावर बंधने पडतील, चित्रपटांचे शासकीयकरण होईल, अशा शक्यता निर्माण झाल्या आहेत. ओटीटी माध्यमं चित्रपटगृहांना पर्याय उपलब्ध करून देत असल्याने अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. अशा अनेक समस्यांची सोडवणूक करीत असताना प्रेक्षकांना केंद्रस्थानी ठेवून विचार करण्याची गरज निर्माण झाली आहे.

**उद्देश :-**

१) कोविड-१९ टाळेबंदी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर ओटीटी माध्यमांचे महत्व स्पष्ट करून सांगणे.
२) ओटीटी माध्यमांच्या नियमनाबद्दल चर्चा घडवून आणणे.
३) ओटीटी माध्यमांच्या चित्रपट प्रदर्शनाच्या भवितव्या बद्दलची मांडणी करणे.
४) ओटीटी माध्यमांच्या मनोरंजन क्षेत्रातील कार्याचा आढावा सादर करणे.
५) ओटीटी माध्यमांचे फायदे स्पष्ट करून सांगणे.

**संशोधन पध्दती :-**

प्रस्तुत शोध निबंधाचा विषय कोविड-१९, टाळेबंदीतून निर्माण झालेल्या ओटीटी माध्यमांचा अभ्यास” (Covid-19 Talebanditun Nirman Zalele OTT Madhyama Abhays) असा आहे. ओटीटी ही नवमाध्यमं चित्रपटगृहांना पर्याय ठरू शकतील काय. या माध्यमांचे कोरोना काळातील आणि कोरोनानंतरच्या काळातील महत्व काय आहे. या माध्यमांच्या वाढत्या वापरामूळे माहिती आणि प्रसारण खात्याला वेगवेगळे नियम तयार करावे लागले. त्याबद्दल सर्वत्र उलटसूलट चर्चा सुरू झाली. प्रसार माध्यमांच्या गळचेपीची ही भाषा सुरू झाली. मनोरंजन, चित्रपट निर्मिती अविरतनपणे चालणारी प्रक्रिया आहे. त्यातूनचओटीटी माध्यमांचा उदय झाला. एक सशक्त मनोरंजन माध्यम म्हणून त्यांच्याकडे पाहिले जात आहे. यासंबंधीची चर्चा, मांडणी या शोधनिबंधाव्दारे केली आहे. कोविड-१९ च्या टाळेबंदीच्या कालावधीत ओटीटी माध्यमांनी केलेल्या कार्याचा आढावा सादर करून या नवमाध्यमांचे फायदे मांडले आहेत. त्या अनुषंगाने शोधनिबंधाची मांडणी करीत असतांना वर्णनात्मक तसेच विश्लेषणात्मक पध्दतीचा अवलंब केला आहे. त्यासाठी प्रसार माध्यमांव्दारे प्रकाशित, प्रसारित बातम्या, वृत्तलेख, लेख यांचे संदर्भ अभ्यासून तज्ञांनी

लिहिलेल्या लेखांचा, ग्रंथांचा आधार घेतला आहे. लेखकाने स्वतः-ची मते, अनुभव, निरीक्षण, दृष्टिकोण इत्यांदीच्या आधारे शोधनिबंधाची मांडणी केली आहे.

ओटीटी माध्यमांचे महत्व :-

कोरोनाकाळात तयार झालेल्या टाळेबंदीमूळे चित्रपट व्यावसायिकांचे फार मोठे नुकसान झाले आहे. चित्रपटगृहे बंद, कलाकारांना काम नाही. या परिस्थितीत चित्रपट उद्योगाला आणि मनोरंजनासाठी सामान्य माणसांना ओटीटी माध्यमांचा फार मोठा आधार मिळाला. सर्वत्र टाळेबंदी असताना घरात अडकून पडलेल्या नागरीकांचे ओटीटी माध्यमांनी मनोरंजन केले. "गुलाबो सिताबो" हा पहिला चित्रपट ओटीटी माध्यमावर प्रदर्षित झाला. त्यामध्ये महानायक अमिताभ बच्चन यांची प्रमुख भूमिका होती. सोबत होते आयुषमान खुराणा. यानंतर अनेक वेब मालिका ओटीटी माध्यमांवरून प्रदर्षित झाल्या. "द बीग बुल" हा अभिषेक बच्चन यांची प्रमुख भूमिका असलेला चित्रपट प्रदर्षित झाला. त्यासाठी हॉटस्टार, नेट फिक्सने पुढाकार घेतला. सर्व भारत बंद असताना कोरोनाकाळात सर्वच बंद असताना ओटीटी या नवमाध्यमांनी मात्र चित्रपट मनोरंजनाचे नवी माध्यमं लोकांना उपलब्ध करून दिली. त्यामूळे नव्या कलाकारांना संधी मिळाली. नवनवीन वेब मालिका सुरू झाल्या.

"कोरोनाकाळात सगळं काही ठप्प झालं असताना लोकांना ओटीटीमूळे मनोरंजनाचं नवं दालन खुलं झालं. लोकांचा या ओटीटी माध्यमांना मिळणारा प्रतिसाद जसा वाढत गेला तसं कलाकारांसाठीही नव्या भूमिकांचा खजिना खूला झाला. अनेक कलाकारांना ओटीटी माध्यमांमूळे कामाच्या नव्या नव्या संधी मिळाल्या आहेत. एरव्ही या कलाकारांना चित्रपट व्यवसायात स्थिरावण्यासाठी खूप संघर्ष करावा लागला असता, मात्र ओटीटी माध्यमांमूळे त्यांना तरत-हेच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. ओटीटी माध्यम हेच भविष्य आहे". असे प्रसिध्द अभिनेता अभिषेक बच्चन आपला द बिग बुल चित्रपट ओटीटी माध्यमांवर प्रदर्षित झाल्यावर एका मुलाखतीमध्ये म्हणाले होते.

**ओटीटी माध्यम :-**

भारतातील काही प्रमुख ओटीटी माध्यमं

| अ.क्र. | ओटीटी माध्यम नाव | कंपनीचे नाव | प्रारंभ इ.स. | भाषा |
|---|---|---|---|---|
| १. | डॉन सिनेमा | डॉन सिनेमा प्रा.लि. | २०१९ | मराठी, हिन्दी, तामिळ, भोजपूरी, मल्यालम, बंगाली |
| २. | डीस्कव्हरी प्लस | डिस्कव्हरी | २०२० | मराठी, हिन्दी, इंग्रजी, तामिली, कन्नड, बंगाली |
| ३. | फील्मी बॉक्स | फिल्मी बॉक्स इंटरटेनमेंट लि. | २०२१ | इंग्रजी, हिंदी पंजाबी |
| ४. | Yupp TV | Yupp TV | २००७ | मराठी, हिन्दी, तामिली, तेलगू, कन्नड |
| ५. | BIG FLIX | रिलायन्स इंटरटेनमेंट | २००८ | मराठी, हिन्दी, तामिली, बंगाली |
| ६. | Diffo Tv | झी इंटरटेनमेंट इन्टरप्रायजेस | २०१२-१८ | इंग्रजी, हिंदी, मराठी, व इतर सात भाषेत |
| ७. | नेट फिल्क्स | नेट फिल्क्स | २०१५ | इंग्रजी, हिंदी, मराठी, व इतर |
| ८. | अरो (Arre) | यू डीजीटल | २०१५ | इंग्रजी, हिंदी |
| ९. | डीस्नी हॉटस्टार | स्टार इंडिया | २०१५ | इंग्रजी, हिंदी, मराठी, व इतर |
| १०. | Eors now | Eors इंटरनॅशनल | २०१५ | हिंदी, मराठी, पंजाबी, बंगाली, तामिळ |
| ११. | Planet Marathi | प्लॅनेट मराठी | २०२१ | मराठी |
| १२. | Shemaroo me | Shemaroo entertainment | २०१९ | हिंदी, मराठी, गुजराती, तामिळी |

संदर्भ :- विकीपिडीया

(तक्ता क्र. १)

भारतात चाळीसहून अधिक ओटीटी माध्यमांवर चित्रपट प्रसारीत केले जातात. अर्थात त्यासाठी प्रेक्षकांना प्रत्येक चित्रपटासाठी १०० ते २००

रूपये भरावी लागतात. काही कंपन्या महिना ३०० ते ५०० रूपयांमध्ये दररोज एक चित्रपट दाखवितात. काही माध्यमांवर फक्त, इंग्रजी, तेलगू, मराठी, हिन्दी भाषेतील स्वतंत्रपणे प्रत्येकी एका भाषेतील चित्रपट प्रसारीत केले जातात. हे चित्रपट प्रेक्षकांना वेब सिरीजच्या माध्यमातून, मोबाईल स्क्रीनवर पाहता येतात, तर काही माध्यमांनी वेब आणि मोबाईलवर पाहण्यासाठीची सुविधा उपलब्ध करून दिलेल्या आहेत. Spuul ही स्वतंत्र कंपनी या क्षेत्रात सर्वात प्रथम म्हणजे २०१२ पासून ते आजपर्यंत कार्यरत आहे. हिन्दी, इंग्रजी, तामिळी, तेलगू भाषेतील चित्रपट ही कंपनी प्रसारीत करते. सोनी लाइव्ह हे माध्यम इ.स. २०१३ पासून सोनी पीक्चर्स नेटवर्कस इंडिया ही कंपनी मराठी, हिन्दी, इंग्रजीसह इतर नऊ भाषेतील चित्रपटांचे प्रसारण करते. इ.स. २०१९, २०२०, २०२१ या कोरोनाकाळात बहुतांश ओटीटी माध्यमांची सुरूवात झाली असल्याचे स्पष्ट होते. मॅझॉन म्यूजिक, पल म्यूजिक, गाना, गुगल हे म्युजिक, हंगामा, जिओ सावन, साऊंड क्लाउड, यु टयूब म्यूजिक या पॉडकॉस्ट प्लॉटफॉर्मवर देखील चित्रपट पाहता येतात.

**ओटीटी माध्यमांनी तयार केलेले काही प्रश्न :-**

कोरोना कालावधीत भारतात सर्वत्र ओटीटी माध्यमांनी आपल्या विविध कार्यक्रमांच्या प्रसारणाव्दारे धुमाकुळ सुरु केला. तूफान ग्राहक मिळत असल्याने वेब सिरीज वाढल्या. अयोग्य पध्दतीने, चुकीचे, प्रतिमा मलिन करणारे कार्यक्रम प्रसारित केले जाऊ लागले. ओटीटी माध्यमांवर पॉर्नोग्राफिक आशयाचे कार्यक्रम दाखविले जात असल्याचे आरोप करण्यात आले. डिजिटल मंचावर जर अयोग्य पध्दतीचा आशय दाखवला जात असेल, तर त्यावर योग्य ती कारवाई करण्यासाठी सरकारच्या मार्गदर्शक तत्वात कुठलीही तरतूद नसल्याचा शेरा सर्वोच्च न्यायालयाने दि. ५ मार्च २०२० रोजी एका प्रकरणात नोंदविला. मेझॉन प्राइम व्हिडीओजच्या भारतातील प्रमुख अपर्णा पुरोहित यांच्यावर तांडव मालिके बाबत गुन्हे दाखल करण्यात आले होते. त्यांना अटकेपासून संरक्षण देण्याचा आदेश न्यायालयाने जारी केला.

न्या. अशोक भूषण, न्या. आर.एस. रेड्डी यांनी उत्तर प्रदेश सरकारला नोटीसा जारी करताना म्हटले होते की, तांडव या मालिके विरोधात गुन्हे दाखल करण्यात आले असले तरी त्यावर पुरोहित यांनी अटकपूर्व जामिन मागितला होता. केंद्राने समाज माध्यमांबाबत केवळ मार्गदर्शक तत्वे तयार केली आहेत. त्यात डिजिटल माध्यमांवर कारवाईसाठी कुठल्याही उपाय योजनांची तरूद नाही. सॉलिसिटर जनरल तूषार मेहता यांनी केंद्राची बाजू मांडताना सांगीतले की, सरकार याबाबत नियामक तत्वे किंवा कायदा तयार करणार आहे. त्याचा मसूदा न्यायालयात सादर करण्यात येणार आहे. सर्वोच्च न्यायालयाने पुरोहित यांना सांगितले की, त्यांच्या याचिकेत केंद्रालाही पक्षकार करण्यात यावे. पुरोहित यांनी उत्तर प्रदेश पोलिसांचे चुकीचे प्रतिमा चित्रण केले आहे. हिंदू देवतांचा अपमान केला असून पंतप्रधानांचे विरोधाभासी चित्र रंगवले आहे. ओव्हर द टॉप म्हणजे ओटीटी यांच्यावर काहीवेळा पॉर्नोग्राफिक आशयही दाखवला जातो. त्यामूळे असे कार्यक्रम प्रसारित करताना त्यावर देखरेख असायला हवी. केंद्राने याबाबत मार्गदर्शक तत्वे जारी करण्याचे आदेश न्यायालयाने दिले होते.

**ओटीटी माध्यमांवर केंद्र सरकारचा अंकुश :-**

नोव्हेंबर २०२० मध्ये केंद्र सरकारने एक अधिसूचना काढून देशातील सर्व ओटीटी माध्यमांवरील अंकुश जाहिर केला. भारतातील सर्व डिजिटल माध्यमांवर केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे नियंत्रण राहणार असल्याची अधिसूचना काढली. माहिती तंत्रज्ञान कायदा २०२१ अंतर्गत ओटीटी माध्यमांवर २६ मे २०२१ पासून निर्बंध घालण्यात आले आहेत. डिजिटल माध्यमांमध्ये ऑनलाईन वृत्त संकेतस्थळे,चालू घडामोडीवर भाष्य करणारी संकेतस्थळे, ओटीटी माध्यमांचा समावेश करण्यात आला. नेटफ्लिक्स, मेझॉन यासारख्या ओटीटी माध्यमांनी आपले कार्यक्रम प्रसारणापूर्वी अर्जाव्दारे पूर्व परवानगी घेणे बंधनकारक करण्यात आले. माहिती आणि तंत्रज्ञान कायद्याने सर्व डिजिटल माध्यमांवर सेन्सॉरशीप लादण्यात आली. पूर्वपरवानगी आणि दाखविल्या जाणा्या कार्यक्रमांवर देखरेख ठेवल्याने ओटीटी माध्यमांना चांगलाच चाप बसला.

भारतात वृत्तपत्रे, वृत्तवाहिन्या तसेच मनोरंजन वाहिन्यांसाठी मार्गदर्शक तत्वे घालवून देण्यात आली असून त्यांचे पालनही केले जाते. वृत्तपत्रे आणि नियतकालिकांसाठी प्रेस कौन्सिल, वृत्त वाहिण्यांसाठी न्यूज ब्रॉडकॉस्ट असोसिएशन, जाहिरातींसाठी

डव्हरटाईजिंग स्टँण्डर्ड कौन्सील, चित्रपटांसाठी सेट्रंल बोर्ड ऑफ फिल्म सेन्सॉरशीप अशा नियामक संस्था आहेत. ऑनलाईन-डिजीटल माध्यमे, ओटीटी माध्यमे देखील आता सेन्सॉरशीपखाली आली आहेत. ओटीटी माध्यमांची पाचेश कोटीची उलाढाल असून ती येत्या चार वर्षात चार हजार कोटीपर्यंत वाढेल. सध्या देशातील सतरा कोटीहून अधिक लोक ओटीटी माध्यमांचे प्रेक्षक आहेत. ते येणा-या चार वर्षात दुपटीहून वाढण्याचा अंदाज या क्षेत्रातील तज्ञांनी वर्तविलेला आहे. वेब सिरिज, चित्रपट, लघूपट, निवेदनपट (डॉक्यूमेंटरी), मूलाखती, चालू घडामोडीवर आधारित कार्यक्रम, इत्यादींमूळे ओटीटी माध्यमांची संख्या वाढेल. त्यामूळे सरकारने या माध्यमांवर सेन्सॉरशीप लादली ते चांगलेच झाले ; परंतू सेन्सॉरशीपच्या नावाखाली नागरिकांचे माध्यम स्वातंत्र हिरावले जाऊ नये ही अपेक्षा सर्वत्र व्यक्त होत आहे. याबद्दल काय होईल हे येणा-या काळात दिसेलच.

**ही तर माध्यम स्वातंत्र्याची गळचेपी :-**

केंद्र सरकारच्या माहिती आणि प्रसारण खात्या अंतर्गत ओटीटी माध्यमांवर सेन्सॉरशीप लावण्यात आली ; परंतू तिचा चित्रपट माध्यमांसारखा दुरूपयोग होता कामा नये. कोविड-१९ च्या दरम्यानच्या काळात ओटीटी या नव्या माध्यमांचा उदय झाला. या माध्यमाने अल्प कालावधीतच मोठया प्रमाणावर नवा प्रेक्षक तयार केला. आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय चित्रपट, मालिका, मनोरंजनपर कार्यक्रमाचे अनेक मार्ग खुले झाले. जनतेच्या माध्यम स्वातंत्र्याचा कधी नवे एवढा मोठया प्रमाणावर विस्तार झाला. नेटफ्लिक्स, मेझॉन प्राइम, डिस्नी, हॉटस्टार, ॲपल टीव्ही, सोनी लिव्ह, झी फाईव्ह, वूट अशा अनेक कंपन्यांनी आपले ओटीटी माध्यमं सुरू केली. ती जबरदस्त सुरू असताना केंद्र सरकारने एका अद्यादेशादारे मनोरंजनाचे सरकारीकरणाबरोबरच माध्यम स्वातंत्र्यावर थेट आक्रमण केल्याची भावना प्रेक्षकांमध्ये निर्माण झाली आहे. ज्या मालिका, चित्रपट प्रेक्षकांनी स्वतः-हून निवडलेल्या आहेत त्या पाहण्यावर सरकारने बंधने का म्हणून टाकावीत. सरकारची बंधने म्हणजे अभिव्यक्ति आणि व्यक्ति स्वातंत्र्यावरील आक्रमणेच होय. चित्रपटांचे प्रमाणिकीकरण करणारे सेन्सॉर बोर्ड अनेक वेळा वादात सापडलेली आहेत. सेन्सॉर बोर्डबद्दल सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की, “थिएटरच्या अंधारात दृकश्राव्य माध्यमांव्दारे दिला जाणारा संदेश मानसाच्या मनावर खोलवर परिणाम करतो आणि त्यातून हिंसा निर्मितीला उत्तेजण मिळू शकते. त्यामूळे चित्रपटांवर नियंत्रण आवश्यक आहे. पण कोणत्या कलाकृती प्रेक्षकांसाठी घातक आहेत याचा निर्णय कोण येणार ? सेन्सॉर बोर्ड ही जबाबदारी निभाऊ शकत नाही. याची अनेक उदाहरणे आहेत. आंतरराष्ट्रीय पातळीवरील उत्कृष्ट चित्रपटांचे भारतात प्रदर्षण होऊ शकत नाही. कोणी काय बघावे याचा निर्णय सरकार कसा घेणार ?” हा नवा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामूळे माध्यम स्वातंत्र्याबरोबरच अभिव्यक्ती स्वातंत्र्य हिरावले जाण्याची दाट शक्यता वाटते.

**ओटीटी माध्यमांचे भवितव्य :-**

ओटीटी माध्यमं सिनेमागृहांना पर्याय म्हणून उभी राहात आहेत अशा प्रकारचा भास आज सर्वत्र निर्माण केला जातोय ; परंतू तो सत्य नाही. ओटीटी माध्यम कधीही थेटपणे चित्रपटगृहाची जागा मिळवू शकणार नाहीत ; परंतू पर्याय मात्र देऊ शकतील असे वाटते. सध्या नवीन चित्रपट एकाच वेळी ओटीटी माध्यमांवर आणि चित्रपटगृहात प्रदर्शित केला जावा अशी मागणी निर्माते करीत आहेत. याला बहु पडदा तसेच एक पडदा चित्रपटगृह व्यावसायिकांनी विरोध केला आहे. चित्रपट निर्मात्याला ओटीटी माध्यमांवर आणि चित्रपटगृहात चित्रपट प्रदर्षणासाठी पर्याय असला तरी चित्रपटगृह चालकांना मात्र पर्याय नाही हे समजून घेतले पाहिजे. चित्रपटगृह चालकाचे भविष्यात नूकसान होणार असले तरी प्रेक्षकांना मात्र एक मोठा पर्याय ओटीटी माध्यमांनी उपलब्ध करून दिला आहे. त्यामूळे या माध्यमाचे भवितव्य उज्वल असेच राहिल.

सूर्यवंशी हा हिंदी भाषेतील मोठा चित्रपट पांघरूण, मी वसंतराव, पावनखिंड, सरसेनापती डंबीरराव, दगडी चाळ-२, दे धक्का-२, झिम्मा, जयंती, गोदावरी, डार्लिंग, फ्री हिट दणका हे मोठे मराठी चित्रपट प्रदर्षणाच्या वाटेवर आहेत. हे सर्व चित्रपट चित्रपटगृहा सोबतच ओटीटी माध्यमांवर देखील प्रदर्षित होण्याची दाट शक्यता आहे. चित्रपटगृहात जाऊन मोठया पडद्यावर चित्रपट पाहण्याची मजा काही औरच असते ; परंतू ओटीटी माध्यमांव्दारे डिजिटल साधनांवर, स्वतः-च्या घरात थाटलेल्या होम

थिएटरवर चित्रपट पाहण्याचा सहकुटूंब आनंद लूटणाऱ्यांची संख्या दिवसें दिवस वाढते आहे. याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. याचाच अर्थ भविष्यात ओटीटी माध्यमं चित्रपटगृहाला पर्याय म्हणून उभे राहू शकतील. या परिस्थितीत चित्रपट निर्माते आणि चित्रपटगृह चालकांनी आपसात भांडत बसू नये, तर समन्वयानं तोडगा काढावा. प्रेक्षक हेच त्यांचे दैवत आहे. प्रेक्षकांचं चित्रपट पाहण्याचं माध्यम बदलण्याचा अधिकार त्यांना नाही. प्रेक्षकांना मागणीप्रमाणे पुरवठा उपलब्ध करून द्यावा. यामध्येच सर्वांचे हीत सामावलेले आहे.

**मनोरंजनाचा खजाना :- ओटीटी माध्यमं :-**

ओटीटी माध्यमं सर्वांना उपलब्ध होऊ शकतात. ही माध्यमं आज डिजिटल स्वरूपात प्रत्येकाच्या खिशात, घरामध्ये उपलब्ध आहेत. डिजिटल माध्यमांनी प्रत्येक व्यक्तिला व्यापून टाकले आहे. मनोरंजन ही प्रत्येकाची गरज आहे. चित्रपटाव्दारे मनोरंजनासाठी सर्व भारतीय समाज अग्रेसर राहिलेला आहे. ओटीटी माध्यमांनी चित्रपटांचा म्हणेच मनोरंजनाचा मोठा खजिना उपलब्ध करून दिला आहे. यातून भारतीय चित्रपटसृष्टीचा आकार, ओटीटी माध्यमांचा प्रसार-प्रचार वाढेल.

भारतीय चित्रपटसृष्टीचा आकार :-

| वर्ष | २००८ | २००९ | २०१० | २०११ | २०१२ |
|---|---|---|---|---|---|
| प्रमाणित झालेले एकूण चित्रपट | १३२५ | १२८८ | १२७४ | १२५५ | १६०२ |
| हिंदी | २४८ | २३५ | २१५ | २०५ | २२१ |
| तेलगू | २८६ | २१८ | १८४ | १९२ | २५६ |
| इतर | ७९१ | ८३५ | ८७५ | ८५८ | ११२५ |
| प्रवेश (विक्री झालेली तिकिटे) (अब्ज रूपयामध्ये) | ३.२५ | २.९ | २.७ | ३ | ३ |
| पडद्यांची संख्या | १०१२० | १००७० | १००२० | १००२० | १००२० |
| देशांतर्गत तिकीट विक्रीतून झालेली कमाई (अब्ज रूपयामध्ये) | ८०.०२ | ६८.५ | ६२ | ६८.८ | ८५.१ |
| परदेशी तिकिट विक्रीतून झालेली कमाई (अब्ज रूपयामध्ये) | ८.९ | ६.८ | ६.६ | ६.९ | ७.६ |
| होम व्हिडीओ (अब्ज रूपयामध्ये) | ३.८ | ४.३ | २.३ | २ | १.७ |
| दूरचित्रवाणी हक्क (अब्ज रूपयामध्ये) | ७.१ | ६.३ | ८.३ | १०.५ | १२.६ |
| पूरक कमाई (अब्ज रूपयामध्ये) (संगीत, डिजीटल माध्यमे इत्यादी) | ३.५ | ३.५ | ४.१ | ४.७ | ५.४ |
| एकुण उत्पन्न (अब्ज रूपयामध्ये) | १०४.४ | ८९.३ | ८३.३ | ९२.९ | ११२.४ |

स्त्रोत :- फिक्की-केपीएमजी अस्वाल २०१३

(तक्ता क्र. २)

आगामी काळात पडद्यांची संख्या कमी होऊन ओटीटी माध्यमांची संख्या वाढेल. ओटीटी माध्यमांवर तिकिटे खरेदी करून चित्रपट प्रेक्षकांची संख्या वाढेल. या उत्पन्न स्त्रोतामध्ये भरपूर वाढ होईल. चित्रपटाचे एकुण उत्पन्न वाढेल. चित्रपट निर्माते, कलाकार यांच्याही उत्पन्नामध्ये वाढ होईल. अभिनेत्यांची, अभिनेत्र्यांची संख्या वाढेल. अनेक प्रतिभावान युवक-यूवती चित्रपट निर्मिती क्षेत्रात असतील.

**ओटीटी माध्यमांचे फायदे :-**

ओटीटी माध्यमांचे अनेक फायदे असल्यामूळेच प्रेक्षक झपाटयाने वाढत आहेत. कोरोना, टाळेबंदीच्या निमित्ताने ओटीटी माध्यमांना मोठी संधी उपलब्ध झाली. त्यांचा फायदा इंटरटेनमेंट क्षेत्रातील, माध्यम समूहांनी उचलला. प्रेक्षकांना आपल्या घरी, पडद्यावर चित्रपट, वेब सिरिज, चालू घडामोडी विषयक कार्यक्रम सहज उपलब्ध होऊ लागले.

सर्वसाधारणपणे ओटीटी माध्यमाचे फायदे खालील प्रमाणे सांगता येतील.

१) इंटरनेटव्दारे सहज सुलभ उपलब्धता.
२) कमीत कमी खर्चात सर्वांना परवडेल असे मनोरंजन.
३) वेळेनूसार करमणूकीसाठीची मोठी संधी.
४) आवडी-निवडींची जोपासना करता येते.
५) आवडते चित्रपट, वेब सिरिज, चालू घडामोडी विषयक कार्यक्रम पाहण्याची सोय.
६) उपलब्ध वेळेनुसार करमणूकीसाठी प्राधान्य देता येते.
७) दर्जेदार चित्रपट पाहाण्याची सुविधा.
८) कोणालाही सहज तात्काळ उपलब्ध होत असलेली माध्यमं.
९) वर्षभर चित्रपटांचे उत्कृष्ट पॅकेजची उपलब्धता.
१०) मोबाईल फोनवर उपलब्धता.
११) घरी स्मार्ट टेलिव्हिजनवर सुध्दा उपलब्धता.
१२) लॅपटॉप, टॅबवर चित्रपट पाहता येतात.
१३) लेटेस्ट चित्रपट पाहाण्याची सुविधा.
१४) नवनवीन कल्पना, प्रतिमा, साकारण्याची आंतरराष्ट्रीय संधीची उपलब्धता.
१५) मनोरंजन उद्योग जगतामधील सर्वांना मोठया प्लॅटफॉर्मची उपलब्धता.

**समारोप :-**

कोविड-१९, टाळेबंदीतून उदयाला आलेली ओटीटी माध्यमं प्रेक्षकांना आकर्षित करू लागली आहेत. डिजिटल प्लॅटफॉर्मवर उपलब्ध असल्याने सर्वसामान्य नागरिकांना ओटीटी माध्यमांची भूरळ आहे. प्रतिष्ठित, नामांकित चित्रपट दिग्दर्शक, निर्माते, नायक, नायिका यांच्याहून अधिक गुणवत्ता असलेले अनेक आहेत हे ओटीटी माध्यमांनी प्रेक्षकांना दाखवून देण्याचे मोठे कार्य केले आहे. त्याचा परिणाम म्हणून ओटीटी माध्यमांना प्रचंड प्रमाणात प्रतिसाद मिळतो आहे. चित्रपट पाहण्यासाठी, एखादी उत्कृष्ट कलाकृतीची अनुभूती घेण्याची जागा म्हणजेच चित्रपटगृह ही संकल्पनाच ओटीटी माध्यमांनी मोडीत काढली. त्यामूळे चित्रपटगृह चालकांची मक्तेदारी संपली. भविष्यात संपूर्ण कुटूंबाला चित्रपट दाखवण्यासाठी चित्रपटगृहात घेऊन जाणारे प्रेक्षक संपून जातील अशी शक्यता निर्माण झाली आहे. प्रत्येक घर लहान, मोठे, सर्व सोयींनी युक्त घर चित्रपटगृह (Home Theathrt) बनेल. प्रेक्षकांना कलाकृती पाहण्याचा संपूर्ण अधिकार राहिला तरच हे सर्व शक्य आहे. अनियंत्रीत कलाकृतीच्या माध्यमातून आंबटशौकिन निर्माण होऊ शकतात. मनोरंजनाला विकृतीचे, लैंगिकतेचे, बदनामीचे डाग लागू शकतात. त्यामूळे ओटीटी माध्यमांचे नियमन आवश्यक ठरते. तशा प्रकारची पावले केंद्र सरकारने उचलून मोठे कर्तव्य पार पाडले आहे. सेन्सॉरशीपच्या नावाखाली ओटीटी माध्यमांचे योग्य नियमन जरूर व्हावे मात्र गळचेपी होऊ नये अशी अपेक्षा आहे. चित्रपट माध्यमासाठी या सेन्सॉरशिपचा इतिहास फारसा चांगला नाही तशी अवस्था ओटीटी माध्यमांची होऊ नये याबद्दलची दक्षता आपल्या सर्वांना घ्यावी लागणारआहे. कोविड-१९, टाळेबंदीतून निर्माण झालेली ओटीटी माध्यमं अधिक सशक्त, प्रभावीपणे पुढे येऊ शकतील. मनोरंजनाच्या माध्यमातून जनतेमध्ये राज करू शकतील.

**संदर्भ ग्रंथसूची :-**

१) दै. लोकसत्ता, संपादक-गिरीश कुबेर, दि. ११ एप्रिल २०२१ च्या अंकातील पृष्ठ-९ वरील “ओटीटी हेच भविष्य” वृत्तलेख.
2) www.google.com , Wikipedia the free encyclopedia
३) दै. लोकसत्ता, संपादक-गिरीश कुबेर, दि. १२ नोव्हेंबर २०२० च्या अंकातील पृष्ठ-८ वरील “डिजिटल माध्यमांवर केंद्राचा अंकुश”, वृत्तलेख.
४) दै. लोकमत, संपादक-चक्रधर दळवी, दि. १३ नोव्हेंबर २०२० च्या अंकातील पृष्ठ-५ वरील “कोणी काय पहावे हे सरकार कोण ठरवणार ?” भक्ती चपळगावकर यांचा लेख.
५) भारतीय माध्यम व्यवसाय, वनिता कोहली-खांडेकर, सेज पब्लिकेशन, नवी दिल्ली, चौथी आवृत्ती, २०१६, पृष्ठ-२२३.